शैक्षणिक वर्ष २००९-१० पासून अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने राज्यात सुरु असलेल्या अभियांत्रिकी/ औषधनिर्माणशास्त्र/ एमबीए/एमसीए/पीजीडीएम महाविद्यालयाअंतर्गत नवीन पदवी/ पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास तसेच प्रवेशक्षमतेत वाढ/घट करण्यास शासनाची मान्यता देणेबाबत

# महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्र. टिइएम २००९/(१०३/०९)/तांशि-४
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांकः १५ जुन, २००९

सदंर्भ :- १. शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. ३३८२/११८३६/(१९०)/तांशि-१, दिनांक २१.०५.१९८३
२. संचालक तंत्र शिक्षण यांचे दिनांक १५.०६.२००९ चे पत्र

**शासन निर्णय :** शैक्षणिक वर्ष २००९-१० पासून अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने राज्यात सुरु असलेल्या अभियांत्रिकी/ औषधनिर्माणशास्त्र/ एमबीए/एमसीए/पीजीडीएम महाविद्यालयाअंतर्गत नवीन पदवी/ पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास तसेच प्रवेशक्षमतेत वाढ/घट करण्यास सोबत जोडलेल्या **परिशीष्ट अ** प्रमाणे मान्यता दिलेली आहे. त्यास शासनाचे मान्यता देण्याचा संचालक, तंत्र शिक्षण यांनी प्रस्तावित केले आहे. त्यास अनुसरुन शासन निर्णय निर्गमीत करण्याची बाब शासनाच्या विचारधीन होती.

आता या शासन निर्णयान्वये अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने दिलेली मान्यता विचारात घेंउन सोबत जोडलेल्या **परिशिष्ट-अ** मधिल संस्थाना त्यांच्या नांवासमोर दर्शविल्यानुसार प्रवेशक्षमतेत वाढ / घट करण्यास व अतिरीक्त नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यास शैक्षणिक वर्ष २००९-१० पासून खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून सदर मान्यता देण्यात येत आहे.

१) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.

२) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बार्बीची पूर्तता संचालक ( तंत्रशिक्षण ) यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

३) सदर अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणासाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील तरतूदीनुसार संबधित विद्यापीठाची मान्यता/संलग्नीकरण घेणे आवश्यक आहे.

४) संबंधित संस्थेने संचालक ( तंत्रशिक्षण ) यांचेकडे आवश्यक ती संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

५) सदर पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार /पध्दतीनुसार करण्यात येतील.

६)	शिक्षण शुल्क समितीने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ नुसार कारवाई करण्यात येईल.

७)	संस्थेने त्यांच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे अंतिम वर्ष पूर्ण होण्यापूर्वी फार्मसी ॲक्ट, १९४८ च्या कलम १२ मधील तरतुदीनुसार फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांची विहित मान्यता प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील.

८)	रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

९)	याशिवाय संचालक ( तंत्रशिक्षण) महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २००९०७०९१४३६१२००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( भ. सं. वानखेडे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति :

१. संचालक, तंत्र शिक्षण , महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, (सचांलकामार्फत)
३. संबधित विद्यापीठ (सचांलकामार्फत)
४. संबधित संस्था

:प्रत माहितीसाठी :

१ अतिरीक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, ७ वा माळा, चंद्रलो बिल्डींग , जनपथ, नवी दिल्ली ११० ००१.

२. सहाय्यक शिक्षण सल्लागार (तांत्रिक) भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल ॲश्युरंस बिल्डींग, चर्चगेट, मुंबई ४०० ०२०

३. निवड नस्ती/तांशि-१

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४१ | सन्मार्ग शिक्षण संस्थेचे मधुकरराव पांडव कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, सर्वे नं. १८३/१, २७८इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलि कम्युनिकेशन इंजिनिअरींग२७८/२५४ भिल्लेवाडा, ता. व जि. भंडारा ४४१००४ | १ | इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलि कम्युनिकेशन इंजिनिअरींग | ६० | ६० |
| | | २ | इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरीग | ६० | ६० |
| | | ३ | कॉम्प्युटर इंजिनिअरींग | ६० | ६० |
| | | ४ | इन्फॉरमेशन टेक्नॉलॉजी | ६० | ६० |
| | | ५ | **मेकॅनिकल इंजिनिअरीग (नवीन अभ्यासक्रम)** | **००** | **६०** |
| | | ६ | **एमबीए (पदव्युत्तर पदवी नवीन अभ्यासक्रम)** | **००** | **६०** |
| | | | **एकुण** | **२४०** | **३६०** |
| ४२ | अल अमीन एज्युकेशनल अँड मेडीकल फाऊंडेशनचे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, शरद कॅम्प्स, पिंपळ जगताप रोड, मु. कोरेगाव-भिमा, ता.शिरुर जि. पुणे | १ | मेकॅनिकल इंजिनिअरींग | ६० | ६० |
| | | २ | इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलि कम्युनिकेशन इंजिनिअरींग | ६० | ६० |
| | | ३ | कॉम्प्युटर सायन्स अॅड इंजिनिअरींग | ६० | ६० |
| | | ४ | इन्फॉरमेशन टेक्नॉलॉजी | ६० | ६० |
| | | ५ | **एमबीए (पदव्युत्तर पदवी नवीन अभ्यासक्रम)** | **००** | **६०** |
| | | | **एकुण** | **२४०** | **३००** |
| ४३ | के. जे.एस. एज्युकेशनल इन्स्टिट्युट ट्रीनिटी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग अँड रिसर्च , सर्वे नं. २५ व २७, पीसोळी, ता. हवेली, जि. पुणे | १ | मेकॅनिकल इंजिनिअरींग | ६० | ६० |
| | | २ | इन्फॉरमेशन टेक्नॉलॉजी | ६० | ६० |
| | | ३ | इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलि कम्युनिकेशन इंजिनिअरींग | ६० | ६० |
| | | ४ | कॉम्प्युटर इंजिनिअरींग | ६० | ६० |
| | | ५ | **इलेक्ट्रीकल इंजिनिअरींग (नवीन अभ्यासक्रम)** | **००** | **६०** |
| | | ६ | **एमबीए (पदव्युत्तर पदवी नवीन अभ्यासक्रम)** | **००** | **६०** |
| | | | **एकुण** | **२४०** | **३६०** |
| ४४ | श्री साई शिक्षण संस्थेंचे नागपूर इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी, सर्वे नं. १३/१, महुझरी, काटोल रोड, ता व जि. नागपूर ४४५३०४ | १ | कॉम्प्युटर सायन्स अॅड इंजिनिअरींग | ६० | ६० |
| | | २ | इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलि कम्युनिकेशन इंजिनिअरींग | ६० | ६० |
| | | ३ | इन्फॉरमेशन टेक्नॉलॉजी | ६० | ६० |
| | | ४ | मेकॅनिकल इंजिनिअरीग | ६० | ६० |
| | | ५ | **एमबीए (पदव्युत्तर पदवी नवीन अभ्यासक्रम)** | **००** | **६०** |
| | | | **एकुण** | **२४०** | **३००** |